गुरुवार ७/१०/२०२१ अंक ३४० ४ ₹ पाने ८

# ऐक्य

अश्विन शु. १, शके १९४३ नक्षत्र चित्रा घटस्थापना, शारदीय नवरात्रारंभ


## स्त्रियांनी सावित्रीबाईप्रमाणे रणरागिणी व्हावे : ॲड. पवार

▲ सातारा, दि. ६ : पुण्यात मुलींच्या शाळेत शिकवायला जाणाऱ्या सावित्रीबाई यांच्यावर शेणफेक करणारे अनेक होते. पण ज्या दिवशी एक धटिंगण, सावित्रीबाई रस्त्याने जाताना त्यांच्या पुढे उभा राहिला त्यावेळी सावित्रीबाईंनी त्याचे मुस्काड फोडले होते. त्यामुळे बाकीचे त्रास देणारे पळून गेले. स्त्रियांनी शांत, सालस, संयमी असावे हे म्हणणे ठीक असले तरी आपल्यावर वेळ आल्यावर सावित्रीबाईंप्रमाणे रणरागिणी व्हायला हवे, असे विचार रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य ॲड.रवींद्र पवार यांनी व्यक्त केले. छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर भवन जवळील उद्यानात कॉलेजच्या शिवविजय-२०२०-२१ या वार्षिक अंकाचे प्रकाशन करताना ते बोलत होते.

छत्रपती शिवाजी कॉलेजच्या शिवविजय या अंकाचे मुखपृष्ठ हे 'पुढच्या काळात स्त्रियांनी स्वसंरक्षण कौशल्ये शिकून स्वतःचे संरक्षण स्वतःच करावे' अशा आशयाचे आहे त्याचा संदर्भ देत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर होते. कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, संस्थेचे ऑडिटर, प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे, सहसचिव संजय नागपुरे उपस्थित होते. लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले, विद्यार्थ्यांनी कॉलेज जीवनात समरस होऊन ज्ञान घ्यावे, जीवन घडवावे. आपण कॉलेजमध्ये खेळलेले खेळ असो, केलेला अभ्यास असो, शिक्षकाविषयीचा आदर असो, कमवा आणि शिका मध्ये केलेले काम असो ..हे सारे दिवस डोळ्यात तरळत राहते. विद्यार्थ्यांनी कॉलेजला कधीही विसरू नये. या कार्यक्रमात अंक चांगला काढल्याबद्दल संपादक डॉ. सुभाष वाघमारे व समितीतील सदस्य डॉ. कांचन नलवडे, डॉ. सादिक तांबोळी, डॉ.बाबासाहेब कांगुणे, डॉ. पौर्णिमा मोटे, प्रा.विजया गणमुखी, डॉ.संजयकुमार सरगडे, प्रा.उर्मिला तांदळे, प्रा. उषादेवी घाडगे, प्रा. तायराश गुप्ता बागवान, प्रा.जयराम सोनटक्के, समीक्षा चव्हाण, ऋतुजा पाटील, वैभव शेडगे, शिवाजी बांदल यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनिलकुमार वावरे, डॉ. रोशनआरा शेख, डॉ. रामराजे माने- देशमुख, प्रबंधक डॉ.अरुणकुमार सकटे, डॉ. शिवाजी पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.गणेश पाटील व ग्रंथपाल झावरे उपस्थित होते.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा